लोकमत

## मध्यवर्ती युवा महोत्सव : विलिंग्डन महाविद्यालयाचा परिसर फुलला; जल्लोषी वातावरण

# तरुणाईचा कलाविष्कार बहरला

संतोष मिठारी/ शरद जाधव।
लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली** : सूरमयी सफर घडविणारे सुगम गायन, ठेका धरायला लावणारे लोकवाद्यवृंद, कला-संस्कृतीचे दर्शन घडविणारी लोककला, देशभक्ती जागविणारी समूहगीते... अशा विविध कलाप्रकारांच्या माध्यमातून बुधवारी तरुणाईचा कलाविष्कार बहरला. उत्साही आणि जल्लोषी वातावरणात शिवाजी विद्यापीठाच्या ३८व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा प्रारंभ येथील विलिंग्डन महाविद्यालयात झाला.

सांगलीच्या उच्च शिक्षण क्षेत्रात शंभर वर्षे पूर्ण करणाऱ्या विलिंग्डन महाविद्यालयाला मध्यवर्ती युवा महोत्सवाचे यजमानपद मिळाले आहे. महाविद्यालयातील खुल्या रंगमंचावर सकाळी अकरा वाजता महोत्सवाचे उद्घाटन झाले. त्यानंतर तासाभरात महोत्सवातील विविध स्पर्धांना सुरुवात झाली. खुल्या रंगमंचावरील सुगम गायनामध्ये भावगीत, भक्तिगीत, मराठी-हिंदीतील भजन आणि गझलांनी सूरमयी सफर घडविली. वेलणकर हॉलमधील एकांकिकांमधून आई-मुलीचे नातेसंबंध, लहान मुलांचे भावविश्व उलगडले.

महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीसमोरील पटांगणातील पथनाट्यातून महागाई, महिला सुरक्षा, भ्रष्टाचार, वाढत्या आत्महत्या आदी सामाजिक प्रश्नांचा तरुणाईने वेध घेतला.

दुपारी साडेतीननंतर महोत्सवातील गती वाढली. खुल्या रंगमंचावरील समूहगीतांतून देशभक्ती जागविली, तर लोकगीतांनी उपस्थितांना डोलविले. भ्रष्टाचार, महिला सुरक्षा, निसर्ग संवर्धन या विषयांवर वक्तृत्व स्पर्धेतून तरुणाईने आसूड ओढला. सोशल मीडियाचा फायदा-तोटा यावर 'वादविवाद' रंगला. पटांगणातील विविध ठिकाणी सांघिक रचनाकृतीतून युवा महोत्सव, स्वच्छता अभियान आणि सेल्फी या विषयांवरील विविध कलाकृती साकारल्या. टाकाऊ वस्तूंच्या वापरातून साकारलेल्या या कलाकृती लक्षवेधक ठरल्या. लघुनाट्य आणि मूकनाट्यातून विविध सामाजिक प्रश्न तरुणाईने मांडले. सायंकाळी पाचनंतर तरुणाईची पावले कांतिलाल शाळेच्या परिसराकडे वळली. तासभरातच हा परिसर गर्दीने फुलला. त्याठिकाणी झांज-कैताळ, धनगरी ढोलांचा दणदणाट, संबळ, तुणतुणे, लेझीम, तुतारीचा निनाद आणि बासरी, घुमकं, ताशांचा खणखणाट, तर सूरपेटीच्या मधुर सुरांनी लोकवाद्यवृंद स्पर्धा रंगली. विविधांगी लोककलेच्या माध्यमातून कला-संस्कृतीचे दर्शन घडले. 'वन्समोअर'ची फर्माईश आणि टाळ्या, शिट्ट्यांची दाद... अशा उत्साही वातावरणात लोककला स्पर्धा रंगली.






१) शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवास सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयात प्रारंभ झाला. त्यातील लोककला स्पर्धेत विद्यार्थी कलाकारांनी मराठी कलासंस्कृतीचे दर्शन घडविले. २) या युवा महोत्सवास पथनाट्यांतून तरुणाईने सामाजिक प्रश्नांचा वेध घेतला.

### दोन नव्या कलाप्रकारांचा समावेश

यावर्षीपासून विद्यापीठाने मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सांघिक रचनाकृती आणि मेहंदी या नव्या दोन कलाप्रकारांचा समावेश केला आहे. त्यामुळे महोत्सवातील कलाप्रकारांची संख्या ३२ वर पोहोचली आहे. तरुणाईच्या कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठी सांघिक रचनाकृती, तर मुलींमध्ये मेहंदीच्या कलेला प्रोत्साहन देण्यासाठी मेहंदी कलाप्रकाराचा समावेश करण्यात आला आहे. सांघिक रचनाकृतीमध्ये टाकाऊ वस्तूंपासून विविध विषयांबाबतची कलाकृती स्पर्धकांनी साकारायची आहे. या प्रकारांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवात सांघिक रचनाकृती स्पर्धेत टाकाऊ वस्तूंमधून स्पर्धकांनी लक्षवेधक कलाकृती साकारल्या.

### यावर्षीपासून पाच विभागात सर्वसाधारण विजेतेपद

विलिंग्डन महाविद्यालयाच्या शताब्दीनिमित्त यावर्षीपासून मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये पाच विभागात सर्वसाधारण विजेतेपद दिले जाणार आहे. त्यामध्ये नृत्य, नाट्य, संगीत, वाङ्मय, कला विभागांचा समावेश आहे. त्यासाठीचे चषक विलिंग्डन महाविद्यालयातर्फे देण्यात येणार आहेत. हे चषक फिरते राहणार असल्याचे प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हनकर आणि विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

# युवा महोत्सव उत्साहात सुरू

**म. टा. वृत्तसेवा,** सांगली

हरीश यमगर



**शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवाला बुधवारी सुरुवात झाली.**

शिवाजी विद्यापीठाच्या ३८व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाला बुधवारी सांगलीत विलिंग्डन महाविद्यालयात जल्लोषात सुरुवात झाली. या महोत्सवात सांगली, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यातील एकूण ९० महाविद्यालयातील युवा कलाकार सहभागी झाले आहेत. तीन दिवसांत सादर होणाऱ्या ३२ कला प्रकारांमध्ये युवा कलाकारांमधील चुरस पाहण्याची संधी कलारसिकांना मिळणार आहे.

महाविद्यालयीन युवा महोत्सवाच्या माध्यमातून जोरदार प्रदर्शन करून बाजी मारण्यासाठी सज्ज असलेल्या विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांच्या गर्दीने विलिंग्डन महाविद्यालयाचा परिसर फुलून गेला आहे. युवा कलाकारांच्या गर्दीतच आमदार सुधीर गाडगीळ यांनी महोत्सवाचे उद्घाटन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. महापौर संगीता खोत, विद्यापीठाचे विद्यार्थी विकास संचालक डॉ. रवींद्र गुरव, महाविद्यालय समितीचे अध्यक्ष किशोर पंडित, कनिष्ठ महाविद्यालय समिती अध्यक्ष सागर फडके, विद्यापीठ सिनेट सदस्य संजय परमणे, विलिंग्डनचे प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हनकर यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

आमदार गाडगीळ म्हणाले, 'विद्यार्थ्यांचे सर्वांगिण व्यक्तीमत्व विकास होण्यासाठी अध्ययनाबरोबरच कला, क्रीडा कौशल्यही महत्वाचे आहे. यंदा विलिंग्डन महाविद्यालयाने शताब्दी वर्षात प्रवेश केला असतानाच विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करण्याचा मान या महाविद्यालयाला मिळाला आहे.'

डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'महोत्सवात सहभागी झालेल्या युवा कलाकारांनी यश मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत. ध्येय निश्चित करुन प्रयत्नात सातत्य ठेवल्यास यश मिळते. स्पर्धेत जय-पराजय असला तरी आपण चुरस कशी निर्माण करू शकलो, यालाही तितकेच महत्व आहे.' युवा महोत्सव समितीचे समन्वयक डॉ. शशिकांत श्रंगारे यांनी आभार मानले. युवा महोत्सवात गुरुवारी शास्त्रीय तालवाद्य, शास्त्रीय सूरवाद्य, नकला, शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय गायन, पाश्चिमात्य एकल गायन, पाश्चिमात्य एकल वादन, पाश्चिमात्य समुहगीत, लोकनृत्य, कातरकाम, व्यंगचित्रण, भित्तीचित्र, मेहंदी, रांगोळी या कलाप्रकारांचे सादरीकरण होणार आहे.

सकाळ

# मध्यवर्ती युवा महोत्सवाचे थाटात उद्‌घाटन

सांगली, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे विलिंग्डन महाविद्यालयात आज थाटात उद्‌घाटन झाले. महोत्सवात सांगली, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यांतील एकूण ९० महाविद्यालयांतील युवा कलाकार सहभागी झाले आहेत. महोत्सवात तीन दिवसांत ३२ कलाप्रकार सादर केले जाणार आहेत.

आमदार सुधीर गाडगीळ यांच्याहस्ते आज महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते. महापौर संगीता खोत, विद्यापीठाचे विद्यार्थी विकास संचालक डॉ. रवींद्र गुरव, महाविद्यालय समितीचे अध्यक्ष किशोर पंडित, कनिष्ठ महाविद्यालय समिती अध्यक्ष सागर फडके, विद्यापीठ सिनेट सदस्य संजय परमणे, विलिंग्डनचे प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हनकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



आमदार गाडगीळ म्हणाले, ''विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कला, क्रीडा कौशल्य महत्त्वाचे आहे. विलिंग्डन महाविद्यालयाने शताब्दी वर्षात मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला प्रेरणा दिली आहे. महाविद्यालयाने नेटक्या पद्धतीने महोत्सवाचे आयोजन केले आहे.'' डॉ. नांदवडेकर म्हणाले,''महोत्सवात सहभागी युवा कलाकारांनी यश मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत. यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चित केले पाहिजे. स्पर्धेत हारजित होत असतेच. परंतु प्रयत्नही महत्त्वाचे आहेत.'' महापौर खोत म्हणाल्या,''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका क्षेत्रासाठी चांगला निधी देण्याची ग्वाही दिली आहे. शहरांचा विकास करताना प्राध्यापक आणि शिक्षक यांना सहभागी करून घेऊन त्यांच्याकडील चांगल्या सूचनांचा विचार करू. विकासाला चालना देताना कला, क्रीडा क्षेत्राचा प्राधान्याने विचार केला जाईल.''

डॉ. गुरव यांनीही मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. ताम्हनकर यांनी स्वागत केले. डेक्कन एज्युकेशनच्या शताब्दी वर्षाचा आढावा सादर केला. युवा महोत्सव समितीचे समन्वयक डॉ. शशिकांत श्रंगारे यांनी आभार मानले.

Kolhapur, Main
01/11/2018 Page No. 8

लोकमत




सांगलीत बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे उद्घाटन आमदार सुधीर गाडगीळ यांच्याहस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी डावीकडून किशोर पंडित, विलास नांदवडेकर, महापौर संगीता खोत, रवींद्र गुरव, प्राचार्य भास्कर ताम्हनकर, संजय परमणे उपस्थित होते.

# महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास

## सुधीर गाडगीळ : मध्यवर्ती युवा महोत्सव सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** महाविद्यालयीन तरुणांमध्ये शिक्षणाबरोबरच व्यावहारिक ज्ञानाची ओळख होण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. यातही विद्यार्थ्यांच्या कलागुणांच्या विकासाला पोषक ठरणाऱ्या उपक्रमांतून व्यक्तिमत्त्वाचा विकास घडतो. त्यामुळे युवा महोत्सवासारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास अपेक्षित आहे, असे प्रतिपादन आमदार सुधीर गाडगीळ यांनी बुधवारी केले.

येथील विलिंग्डन महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, तर महापौर संगीता खोत, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. रवींद्र गुरव प्रमुख उपस्थित होते.

आमदार गाडगीळ म्हणाले, विलिंग्डन महाविद्यालयाच्या शताब्दी वर्षातील अनेक कार्यक्रमांपैकी युवा महोत्सव हा महत्त्वाचा कार्यक्रम आहे.

> विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उत्तम संधी युवा महोत्सवातून मिळत आहे. महाविद्यालयीन तरुणाईला विविध कलाप्रकारांची माहिती मिळत आहे.
>
> **-अजय पोर्लेकर**, कोल्हापूर.

> विविध कलागुण अवगत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी युवा महोत्सव सणासारखाच असतो. आत्मविश्वास वाढीबरोबरच आपल्यातील उणिवांची जाणीव होते. करिअरच्या दृष्टीने कलाक्षेत्राकडे पाहणाऱ्यांसाठी महोत्सव उपयोगी ठरतो.
>
> **- प्रतीक्षा धनवडे**, सातारा

विद्यार्थ्यांनी प्रतिस्पर्धी संघाकडून त्यांची कला, प्रेरणा शिकण्याचा प्रयत्न करावा. या कार्यक्रमास किशोर पंडित, संजय परमणे, प्रा. राजकुमार पाटील आदी उपस्थित होते.

विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हनकर यांनी स्वागत केले. युवा महोत्सव समितीचे समन्वयक डॉ. शशिकांत श्रृंगारे यांनी आभार मानले.

पुढारी

## संक्षिप्त

# इंदिरा गांधी, सरदार पटेल यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी आणि माजी उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती यानिमित्त या दोन महान नेत्यांना शिवाजी विद्यापीठात आदरांजली वाहण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत या नेत्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, डॉ. आर. पी. भणगे, डॉ. नीलांबरी जगताप आदींसह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.